# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ११/०८/२०२५ ( सोमवार )**

---

## पोलीस स्टेशन देवलापार अंतर्गत प्राणांतीक अपघाताबाबत..

काल दिनांक.१०/०८/२०२५रोजी दुपारच्या सुमारास **अमित भुरा यादव रा. वार्डनं. २ घर क्रं. ३१० लोनारा पो.गुमथी (कोराडी) नागपुर हा** त्याचे मोटार सायकल वर त्याची पत्नी **सौ. ग्यारशीबाई अमित यादव रा. गुमथी (लोनारा) कोराडी हिला मागच्या सिटवर** बसवुन त्याचे सध्याचे राहते घरी कोराडी येथुन मूळगावी **शिवनी जिल्हयतील करनपुर ता.लखनादौन येथे** जाण्यासाठी निघाला असता रस्त्यात पो.स्टे. देवलापार हद्दीतील मोरफाटा दरगाह जवळ, नागपुर ते जबलपुर जाणाऱ्या रोडवर त्याचे मो.सा.ला एका अनोळखी आयशर ट्रक चालकाने कट मारल्याने त्याची मोटार सायकल स्लिप होवुन त्याची त्नी खाली पडली व मागुन येणाऱ्या अज्ञात वाहणाचे चाक तिचे अंगावरुन गेल्याने ती जागीच मरण पावली. परंतु **अमित भुरा यादव** यांनी घाबरुन सदर अपघाता बाबत पोलीसांना तसेच ॲम्ब्युलेंसला कोणतीही माहीती न देता सदर घटनास्थळावरुन तिचे प्रेत उचलुन पुन्हा त्याचे मोटार सायकलवर मागच्या सीटवर बसुवन **शिवनी जिल्हयतील करनपुर ता. लखनादौन** येथे न जाता त्याचे राहते घरी **लोनारा**, कोराडी येथे जाण्यास निघाला. सदर अपघाताची माहीती स्थानिक लोकांकडुन देवलापार पोलीसांना मिळाली व पो.स्टे.देवलापार चा स्टाफ घटनास्थळी पोहचल्यावर सदर इसम घटनास्थळावरुन महीलेचे प्रेत घेवुन निघुन गेला होता, म्हणुन देवलापार पोलीसांना घटनास्थळी काहीच आढळुन न आल्याने देवलापार पोलीसांनी खुमारी टोल नाका येथे नाकाबंदी करत असलेले महामार्ग सुरक्षा पथक, आमडी येथिल पो.स्टाफ ला माहिती दिली, **त्यांनी सदर मो.सा चे चालकास थांबविण्याचा प्रयत्न केला, परंतु सदर चालकाने त्याचे मोटार सायकल न थांबवता तो हायवे ने पुढे निघाला सदर बाबत** महामार्ग सुरक्षा

पथक,आमडी येथिल पो.स्टाफ नी पोलीस नियंत्रण कक्ष ना.ग्रा.येथे सुचना दिली व सदर मोटार सायकल चा पाठलाग केला. पाठलाग करते वेळी पोलीसांनी त्याला वारंवार थांबण्याचा इशारा करुनही त्याने त्याची गाडी थांबविली नाही म्हणुन महामार्ग सुरक्षा पथक,पोलीस यांनी त्याचे शोध कामी मदत व्हावी या हेतुने त्यांचे स्मार्टफोन वर व्हिडीओ बनविला.

सदर मो.सा.चालक हा **आमडी फाटा मार्गे पारशिवनीचे दिशेने गेला. सदर बाबत पारशिवनी पोलीसांना माहीती मिळताच पारशिवनी पोलीसांनी** सदर इसमाचे शोध कामी आमडी फाटा ते शिवाजी चौक, पारशिवनी पर्यंत नाकाबंदी लावली. मात्र सदर मो.सा. चालकाने पारशिवनी कडे न येता आड मार्गाने कोराडीकडे निघुन गेला. दरम्यान **वाहन ॲप द्वारे** सदर मो.सा.च्या **मालकाचा नाव पत्ता व मोबाईल नं. प्राप्त केला असता सदर मो.सा.ही 'अमितभुरा यादवरा. वार्डनं. २ घर क्रं. ३१० लोनारा पो. गुमथी (कोराडी) नागपुर**' यांचे नावावर असल्याने त्याबाबत पो.स्टे.खापरखेडा व पो.स्टे.कोराडी यांनी माहीती देण्यात आली. वाहन मालकाला  संपर्क साधुन नमुद  घटने बाबत सविस्तर माहीती  विचारली असता  त्याचे म्हणण्यानुसार सदर घटने मुळे तो घाबरुन गेला होता व त्याला काही न सुचल्याने तो पत्नीला गाडीवर बांधुन कुठेही न थांबता घटनास्थळावरुन कोराडी येथे त्याचे राहते घरी आला असुन सदर ठिकाणी कोराडी येथिल पोलीस स्टाफ पोहचला आहे, असे सांगितले. त्यांनंतर कोराडी पोलीसांनी सदर मयत महीलेवर मेयो हॉस्पिटल नागपुर येथे पोस्टमार्टेम केले असुन तिचा पती **अमित भुरा यादव याची तक्रार घेवुन** आज रोजी पो.स्टे.देवलापार येथे अप.क्रं. ३५४/२०२५ कलम २८१,१०६(१)भा.न्या.सं. सहकलम १३४,१८४मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन देवलापार पोलीस अधिक तपास करीत आहेत. पोलीसांकडुन तपासादरम्यान  चार संशयीत आयशर ट्रक निश्चित करण्यात आले असुन फिर्यादीकडुन त्याचे पडताळणीचे काम सुरू आहे.

## मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी  घेतली कळमेश्वर येथील औदयोगिक प्रमुखांची बैठक

आज दिनांक ११/०८/२०२५ रोजी मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी कळमेश्वर पोलीस स्टेशन हद्दीतील औदयोगिक क्षेत्रातील प्रमुखांची बैठक

घेवुन  त्यांचेसोबत संवाद साधुन त्यांच्या समस्या जाणुन घेतल्या. मा. पोलीस अधिक्षकांनी तात्काळ प्राप्त तक्रारींची दखल घेत तसेच संबधीतांना तक्रारींचे निराकरण करण्याबाबत आदेशीत केले. तसेच इतर मुद्दयांवर चर्चा करून योग्य सुचना दिल्या. सदर बैठकीत श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री सागर खरडे, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर उपविभाग आणि पोलीस निरीक्षक श्री मनोज काळबांधे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कळमेश्वर हे उपस्थित होते. सदर बैठकीस ३५ ते ४० औदयोगिक क्षेत्रातील प्रमुख उपस्थित होते.






## खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीस अटक

पोस्टे खापरखेडा अंतर्गत मौजा ताज चौक, सिल्लेवाडा येथे १०/८/२५ चे ११/०० वा ते ११/३० वा फिर्यादी नामे प्रितम रामगिर वर्मा, रा. वार्ड न.५ सिल्लेवाडा, हवा महल, ता. सावनेर, जि.नागपूर, हा त्याचा मित्र लव उर्फ गोलू संतोष सिन्हा वय ३५ वर्ष, रा. पोटा (जखमी) याचे सह हवा महल ते लालचौक, सिल्लेवाडा येथे मो.सा. ने येत असतांना ताज चौक, सिल्लेवाडा येथे आरोपी क्रं नामे १. साजन मदन सिंग वय २४ वर्ष, आरोपी क्रं २. अमन अर्जून राजभर वय २५ वर्ष, दोन्ही रा.सिल्लेवाडा, ता.सावनेर. यांनी संगनमत करून जुन्या वादाचे कारणावरून लव उर्फ गोलू संतोष सिन्हा यास लाकडी दांडयाने जोरजोरात मारून गंभिररित्या जख्मी करून जिवानिशी ठार मारण्याचा प्रयत्न केला अशा तोंडी रिपोर्ट वरून पोस्टे खापरखेडा येथे नमुद आरोपीतांविरूद्ध कलम १०९(१), ३(५) भा.न्या.सं अन्वये गुन्हा नोंद केला असुन आरोपीस पोलीसांनी अटक केली आहे.मा. न्यायालयाने नमुद दोन्ही आरोपीतांना दिनांक १३/०८/२०२५ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजुर केला आहे.

## खुनाच्या गुन्हयातील आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. सावनेर** :— फिर्यादी नामे आकाश रमेश वाढीकर, रा. तेलकामठी ता. कळमेश्वर जि. नागपुर यांच्या रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सावनेर येथे अप क्र. ३४/२०१९ कलम ३०२ भादंवि अन्वये गुन्हा नोंद झालेला होता.

सदर गुन्हयाची हकीकत यप्रमाणे आहे की, दिनांक ०९/०२/२०१९ रोजी मौजा तेलकामठी येथील शेतशिवारात फिर्यादीचे वडील मृतक नामे रमेश संतोष वाढीकर आणि त्यांच्या सख्खा भाउ यातील आरोपी नामे गणेश संतोष वाढीकर, वय ४३ वर्षे, रा. तेलकामठी, ता. कळमेश्वर यांच्या मध्ये शेतातील पिकांवर पडलेल्या रोगांबाबत मिळाणाऱ्या पैशांवरून वाद झाला. त्यामुळे आरोपीने मृतकाचे डोक्यात दगड मारल्याने ते जखमी झाले त्यांना उपचारासाठी सावनेर येथील सरकारी दवाखान्यात नेले असता वैदयकीय अधिकारी यांनी त्यांना मृत घोषीत केले.

श्री मल्हारी ताळीकोटे, पोलीस उपनिरीक्षक, नेम पोलीस स्टेशन सावनेर यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. आज दिंनाक ११/०८/२०२५ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायधीश — ०३ श्री एस. एच. ग्वालानी यांनी नमुद नामे गणेश संतोष वाढीकर, वय ४३ वर्षे, रा. तेलकामठी, ता. कळमेश्वर **यास कलम ३०४ (२) भादंवि मध्ये ७ वर्षे सश्रम कारावास व २०,०००/—रूपये दंड. दंड न भरल्यास २ महिने साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे.**

सरकारचे वतीने ए.पी.पी. श्रीमती कल्पना पांडे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन पोलीस हवलदार मधुकर आदमने ब.नं ३७६ पो.स्टे.सावनेर यांनी मदत केली आहे

## पोलीस ठाणे रामटेक हद्दीतील मौजा उमरी शेत शिवारात अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमावर कायदेशिर कार्यवाही

**पोलीस स्टेशन रामटेक** :— रामटेक पोलीसांना गुप्त बातमीदाराकडुन खात्रीशीर माहीती प्राप्त झाली की, मौजा उमरी शेत शिवार येथे मोहाफुल हातभट्टीची दारू काढल्या जात आहे. अशी माहीती प्राप्त होताच रामटेक पोलीसांनी नमुद ठिकाणी जावुन रेड केली असता **आरोपी नामे—**

**अर्जुन सनबा शेरकुरे, वय ४८ वर्षे, रा. उमरी ता.रामटेक** हा मोहाफुल रसायन सडवा बाळगुन हातभट्टीने मोहाफुलाची गावठी दारू काढतांना मिळुन आला. आरोपीचे ताब्यातून १) १०० लिटर मोहाफुल सडवा रसायन किंमती ५०००/—रू. २) एका प्लास्टिक डबकीमध्ये ३० लिटर मोहाफुल गावठी दारू किंमती ३०००/— रू. ३) एक लोखंडी ड्रम ५००/—रू. ४) जळावु लाकडासह इतर साहित्य असा एकुण ११,४००/— रूपयांचा मुद्देमाल मळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ७ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हे नोंद

दिनांक १०/०८/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूध्द खालील प्रमाणे गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन खापा** अंतर्गत आरोपी नामे सोनु प्रकाश साखरे, वय ३८ वर्ष , रा.गांजाखेत चौक, हंसापुरी ,खदान महात्मा फुले बाजार, नागपूर, **पोलीस स्टेशन कन्हान** अंतर्गत आरोपी नामे मोहम्मद सबारप सज्जाक शेख, रा. खदान न. ०३ कन्हान, जि नागपुर , **पोलीस स्टेशन मौदा** अंतर्गत आरोपी क्रं १ राष्ट्रपाल मारोती दुपारे, वय ६० वर्ष, रा. नवेगाव ता. मौदा, जि. नागपुर , आरोपी क्रं २ जितेंद्र आसाराम घोनमोडे, वय २३ वर्ष रा. गोधनी झिंगाबाई टाकळी नागपूर आणि आरोपी क्रं ३ सागर सुधाकर मानकर, वय ३० वर्ष, रा. उप्पलपाडी, **पोलीस स्टेशन कोंढाळी** अंतर्गत आरोपी नामे राजु धर्माजी सलामे, वय ४७ वर्ष रा अमरावती रोड जैन मंदीर जवळ बाजारगाव जि. नागपूर आणि **पोलीस स्टेशन काटोल** अंतर्गत चेतन रामदास बानाईत वय ३२ वर्ष रा.येनवा ता.काटोल जि.नागपुर असे नमुद आरोपी सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थाचे सेवन करतांना मिळुन आल्याने नमुद ७ आरोपीतांवर कलम २७ एन. डी.पी.एस. कायदयान्वये ७ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

## रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक १०/०८/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक ११/०८/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री बापु रोहोम, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल विभाग यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. तसेच पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत मरामाय नगर, अण्णाभाऊ साठे नगर, पेठ बुधवार, काळे चौक, हत्तीखाना, सावरगाव रोड,भटपुरा येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. सदर कोबिंग ऑपरेशन श्री बापु रोहोम यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. तसेच काटोल टोल नाका येथे नाकाबंदी करून संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली. सदर कारवाईमध्ये पोलीस स्टेशन काटोल चे अधिकारी, अंमलदार आणि दंगा नियत्रंण पथकाचे अंमलदार हजर होते.




लेडिज कॉर्नर
समृद्धी
ब्यूटी पार्लर



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने